आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१९ फेब्रुवारी २०२६ - गुरूवार

**ठळक बातम्या**

- छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती राज्यभरात उत्साहात साजरी; शिवनेरीवर मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शासकीय सोहळा

- एसटीच्या ताफ्यात यंदा पहिल्या टप्प्यात ८ हजार ३०० गाड्या दाखल होणार असल्याची परिवहन मंत्र्यांची माहिती

- नवी दिल्ली इथं आयोजित इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ चं औपचारिक उद्घाटन

**आणि**

- पवित्र रमजान महिन्याला आजपासून सुरुवात

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती आज राज्यभरात उत्साहात साजरी होत असून ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

राज्यातला मुख्य शासकीय सोहळा महाराजांचं जन्मस्थान असलेल्या किल्ले शिवनेरीवर मोठ्या थाटात संपन्न झाला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी किल्ल्यावरच्या शिवकुंजावर छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. फडनवीस यांनी शिवनेरीवर परंपरेप्रमाणे बाळ शिवरायांचा पाळणा झुलवला आणि शिवरायांच्या पालखीची विधिवत पूजा केली. यावेळी महिलांनी पाळणा गाऊन संपूर्ण परिसर शिवमय करून टाकला.

महाराजांनी उभारलेलं स्वराज्य हे अन्याय आणि दडपशाही मुक्त राज्य होतं आणि त्यात महिलांचा सन्मान, शेतकऱ्यांचं कल्याण आणि प्रत्येक जाती-धर्माच्या व्यक्तीला न्याय मिळत होता, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. महाराजांचं जलव्यवस्थापन, करप्रणालीतली सुधारणा आणि नौदलाच्या उभारणीतली दूरदृष्टी, याचा मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात विशेष उल्लेख केला. या सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, तसंच अन्य मान्यवर उपस्थित होते.

शिवजयंती हा 'आत्मभानाचा सण' असून महाराजांनी रयतेच्या मनात स्वाभिमानाचं स्फुल्लिंग चेतवलं, ज्यामुळे आजही सामाजिक वीण घट्ट आहे, असं ज्येष्ठ नेते **शरद पवार यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे**.

तर शिवराय मनामनात आणि शिवजयंती घराघरात साजरी करण्याचं आवाहन, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष **हर्षवर्धन सपकाळ यांनी** केलं आहे.

**<><><><><>**

राज्यात शिवजयंतीनिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

याविषयी अधिक माहिती ऐकुया आमच्या प्रतिनिधीकडून.....

**----व्हीसी----**

***(छत्रपती** संभाजीनगर इथं दुचाकी, चारचाकी वाहन फेऱ्यांसह विविध ठिकाणी रक्तदान शिबीरं तसंच आरोग्य तपासणी शिबीरं आणि विविध स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं आहे. **नाशिक** शहराच्या चौकाचौकात शिवरायांच्या जीवनावर आधारीत देखावे तसंच अश्वारूढ पुतळे उभारण्यात आले आहेत. **नागपुरात** आज पहाटे ५ वाजल्यापासूनच महाराजांच्या पालखी सोहळ्याला सुरुवात झाली. महिलांचं मुद्रा पथक या सोहळ्याचं मुख्य आकर्षण ठरलं. **बीड** शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त अश्वारूढ पूर्णाकृती शिवतीर्थ इथे आज शासकीय पूजा करण्यात आली. **रत्नागिरी** आज सकाळी शहरात मोठ्या उत्साहात भव्य पदयात्रा काढण्यात आली. **गडचिरोलीत**, सांस्कृतिक कार्यक्रम आणि पदयात्रेचं आयोजन करण्यात आलं. शिवरायांना मानवंदना म्हणून **अकोल्यात,** ३० हजार चा◌ैरस फुटची रांगोळी काढण्यात आली आहे. तर **सोलापूर** शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौकात पार पडलेल्या पाळणा कार्यक्रमानं संपूर्ण वातावरण, उत्साह, अभिमान आणि शिवभक्तीनं फुलून गेलं आहे. **वाशिम, धाराशिव, जळगाव** मधेही शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.)*

**<><><><><>**

चंद्रपूरमध्ये संख्याबळ असूनही महापौरपदाच्या निवडणुकीत झालेल्या पराभवाची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्याचा निर्णय प्रदेश काँग्रेसनं घेतला आहे. काँग्रेसचे राज्य प्रभारी रमेश चेन्निथला यांच्या अध्यक्षतेखाली लवकरच ही समिती स्थापन केली जाईल अशी माहिती काँग्रेसच्या एका ज्येष्ठ नेत्यानं दिली. काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते

विजय वडेट्टीवार यांनीही या प्रकरणाची चौकशी करायला सहमती दर्शवल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

एसटीच्या दीर्घकालीन धोरणानुसार पुढच्या काही वर्षांत २० ते २५ हजार बसगाड्या खरेदी करण्याला राज्य शासनाची तत्वतः मान्यता मिळाली असून, यंदा पहिल्या टप्प्यात ८ हजार ३०० गाड्या दाखल होणार आहेत. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली. राज्य शासनानं महिलांना तिकिटात ५० टक्के सवलत आणि ७५ वर्षांवरच्या ज्येष्ठांना मोफत प्रवास दिल्यानं प्रवाशांचा ओघ पुन्हा वाढू लागला. सध्या दररोज सुमारे ५० लाख प्रवासी एसटीने प्रवास करतात; मात्र अनेक मार्गांवर फेऱ्या अपुऱ्या पडत आहेत, असं त्यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्तेचं लोकशाहीकरण होणं आवश्यक असून, विशेषतः ग्लोबल साऊथ साठी कृत्रिम बुद्धिमत्ता हे समावेशन आणि सक्षमतेचं साधन बनायला हवं असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथं इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ चं औपचारिक उद्घाटन करताना बोलताना बोलत होते. जगातली सर्वात मोठी तरुण लोकसंख्या, आणि सर्वात मोठ्या तंत्रज्ञान प्रतिभेचं केंद्र असलेल्या भारतात एआय, म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेवरच्या परिषदेचं आयोजन होत असून, ग्लोबल साऊथ मधल्या देशांसाठी ही अभिमानास्पद गोष्ट आहे, असं ते यावेळी म्हणाले.

- **- होल्ड बाईट मोदी - -**

कृत्रिम बुद्धिमत्ता हा मानवी इतिहासातला एक परिवर्तनकारी अध्याय असून, भारत केवळ एआय क्रांतीचा भाग नाही, तर त्याचं नेतृत्व करतो, आणि त्याला आकार देतो, असं पंतप्रधान म्हणाले. या परिषदेला जगभरातले नेते आणि उद्योग आघाडीच्या कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित आहेत.

**<><><><><>**

निवडणुकीच्या आधी राज्य सरकारांकडून जाहीर होणाऱ्या मोफत सुविधा आणि योजनांवर सर्वोच्च न्यायालयानं आज ताशेरे ओढले. तमिळनाडू पॉवर डिस्ट्रीब्युशन कंपनी लिमिटेडनं दाखल केलेल्या याचिकेवरची ही सुनावणी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत,

न्यायमूर्ती जॉयमल्या बॅगची आणि न्यायमूर्ती विपुल पंचोली यांच्या खंडपीठासमोर झाली. या याचिकेत वीज सुधारणा नियम २०२४ मधील नियम २३ ला आव्हान देण्यात आलं आहे. अशा मोफत योजना देशाच्या दीर्घकालीन आर्थिक विकासाला अडथळा आणतात, असं निरीक्षण सर्वोच्च न्यायालयानं नोंदवलं आणि हे असं किती काळ चालणार असा सवाल न्यायालयानं केला. ज्यांना परवडते आणि ज्यांना परवडत नाही अशा लोकांमध्ये फरक न करता दिल्या जाणाऱ्या सुविधा म्हणजे फक्त तुष्टीकरण आहे, आर्थिक विकासाला चालना मिळत नाही, असं न्यायालयानं म्हटलं आहे. जर लोकांना थेट पैसे मिळाले तर ते काम करतील का, असं थेट लाभ हस्तांतरण योजनांचा उल्लेख करत न्यायालयानं विचारलं.

<><><><>

सर्वोच्च न्यायालयाची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय आपण देश सोडून जाणार नाही असं हमीपत्र उद्योजक अनिल अंबानी यांनी आज दाखल केलं. रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेडशी संबंधित मोठ्या बँक कर्जांच्या घोटाळा प्रकरणात सध्या सुरू असलेल्या चौकशीच्या पार्श्वभूमीवर अनिल अंबानी यांनी हे हमीपत्र दिलं आहे. ते न्यायालयाच्या अनुमतीशिवाय देश सोडून जाणार नाहीत अशी हमी त्यांच्यातर्फे त्यांचे वरिष्ठ वकील मुकूल रोहतगी यांनी  ४ फेब्रुवारीला न्यायालयात दिली होती. त्याचा पुनरुच्चार त्यांनी या हमीपत्रात केला आहे.

<><><><>

मुस्लिम समाजामध्ये पवित्र समजला जाणारा रमजानचा महिना आजपासून सुरू झाला. काल संध्याकाळी देशाच्या अनेक भागात चंद्रदर्शन झालं. रमजान हा इस्लामिक दिनदर्शिकेतला नववा महिना आहे. महिन्याच्या शेवटी ईद-उल-फित्र साजरी केली जाते.

<><><><>

लातूरचं ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर आणि रत्नेश्वर देवालय इथे महाशिवरात्री पासून यात्रेला सुरुवात झाली आहे. त्यानिमित्त २६ आणि २७ फेब्रुवारी रोजी भव्य पशुपक्षी, अश्व आणि श्वान प्रदर्शन भरणार आहे. यात्रा समिती, जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभाग आणि लातूर पंचायत समिती यांच्यातर्फे हा उपक्रम होणार आहे.

<><><><>

अकोला जिल्ह्यात तुती ची लागवड  आणि रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी राज्य शासनाचं 'महारेशीम अभियान २०२६' राबवलं जात असून, या अंतर्गत तुती ची नव्यानं लागवड करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांची नोंदणी प्रक्रिया सुरू आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी ५ मार्चपर्यंत 'आपले सरकार' पोर्टलवर वस्त्रोद्योग विभागा अंतर्गत ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

अकोला जिल्ह्यात सोयाबीन, कपाशी या पारंपरिक पिकांऐवजी नवीन प्रयोग करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढत असून,  रेशीम शेतीतून चांगलं उत्पन्न मिळत असल्यामुळे अनेक शेतकरी याकडे वळले आहेत.

<><><><><>

ठाणे जिल्ह्यात टिटवाळा शहरातल्या बल्याणी बाजार भागात काल एका ट्रकनं अनेक वाहनांना आणि पादचाऱ्यांना धडक देऊन झालेल्या अपघातात सहा जण जखमी झाले, तर अनेक वाहनांचं नुकसान झालं. ट्रक चालक फरार असून, या प्रकरणी तपास सुरु असल्याचं पोलीस सूत्रांनी सांगितलं.

//<><><><><>//